**ठळक बातम्या**

- एचएमपीव्ही संसर्गाबाबात जनतेने घाबरुन जाऊ नये. तसंच राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांनी श्वसनरोगांसाठी व्यवस्थापनाची फळी मजबूत करावी असं केंद्रसरकारचं आवाहन
- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सीबीआय च्या ‘भारत पोल’ या पोर्टलचं उद्घाटन
- दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर होणार

**आणि**

- नेपाळ-तिबेट सीमेवर आज सकाळी झालेल्या भूकंपात ३२ जणांचा मृत्यू/ उत्तर भारतातही जाणवले भूकंपाचे धक्के

**<><><><><>**

एच.एम.पी.व्ही विषाणूमुळे जनतेनं घाबरून जाऊ नये, असं केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांबरोबर दृक्श्राव्य माध्यमात घेतलेल्या बैठकीत त्यांनी देशातली श्वसनाच्या आजारांची सद्यःस्थिती, त्याचं व्यवस्थापन तसंच HMPV संसर्गाच्या प्रकरणांचा आढावा घेतला. राज्यांनी इन्फ्लूएंझा आणि गंभीर स्वरूपाच्या श्वसन रोगांच्या व्यवस्थापनाची फळी मजबूत करावी, असे निर्देश त्यांनी दिले. राज्यांना माहिती, शिक्षण आणि संवाद, तसंच विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी जनतेमध्ये जागरूकता वाढवावी, अशी सूचना त्यांनी केली.

श्वसनाशी संबंधित आजाराची वाढती प्रकरणं हाताळण्यासाठी देश सज्ज असल्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

भारतात एच.एम.पी.व्ही म्हणजेच ह्युमन मेटान्यूमोव्हायरसनं बाधित आणखी दोन रुग्ण आढळून आले असले, तरी काळजी करण्यासारखी परिस्थिती नसल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी शास्त्रज्ञ डॉ. सौम्या स्वामिनाथन यांनी म्हटलं आहे.  हा विषाणू नवीन नाही, तसंच त्यामुळे सौम्य स्वरूपाचा संसर्ग होतो, असं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी हात स्वच्छ धुणे हा एक उपाय असून, एखादा रोगजनक विषाणू आढळून आल्यावर घाबरून जाऊ नये, असं आवाहन त्यांनी केलं आहे. इन्फ्लूएंझा आणि गंभीर स्वरूपाच्या श्वसन रोगाला कारणीभूत ठरणाऱ्या विषाणूंपैकी सुमारे 3 टक्के वाटा एचएमपीव्हीचा असल्याचं प्रयोगशाळेतल्या चाचणी दरम्यान आढळून आल्याचं आयसीएमआर अर्थात भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेनं म्हटल्याचं त्यांनी सांगितलं. २००१ साली एच.एम.पी.व्ही या विषाणूचा शोध लागला.
खोकला, ताप, सर्दी आणि धाप लागणे, ही या विषाणूच्या संसर्गाची लक्षणं आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात नागपूरमध्ये एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्याचा केवळ संशय असल्याचं  नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ . विपीन इटनकर यांनी आज प्रसार माध्यमांना सांगितलं. संशयित नमुने आयसीएमआर एनआयव्ही कडे पाठवले

असून, त्याचा अहवाल आल्यावर योग्य उपाययोजना केल्या जातील, असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**होल्ड - बाईट- ईटनकर.....**

नागपूरमध्ये दोन लहान मुलांमध्ये एचएमपीव्ही संसर्गाची लक्षणं आढळून आल्याचं वृत्त प्रसारित झालं होतं, त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हा खुलासा केला.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्ली इथं सीबीआय नं विकसित केलेल्या 'भारत पोल' या पोर्टलचं उद्घाटन केलं. यावेळी त्यांनी सीबीआय च्या ३५ अधिकाऱ्यांना असामान्य सेवेबद्दल पोलीस पदकं प्रदान केली. विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक आणि तपासातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी केंद्रीय गृहमंत्री पदकाचा यात समावेश आहे.

'भारतपोल' पोर्टल आंतरराष्ट्रीय तपासाला नव्या युगात घेऊन जाणार असल्याचं अमित शाह यावेळी म्हणाले.

**होल्ड-'बाईट'....**

इंटरपोलकडून आंतरराष्ट्रीय सहाय्य मिळवण्यासाठी विनंती प्रक्रिया सुव्यवस्थित करणं, हे 'भारतपोल' पोर्टलचं उद्दिष्ट असून, रेड नोटिसांसह इंटरपोलच्या इतर नोटिसा जारी करणं, याचा यात समावेश आहे.

'भारतपोल' पोर्टल कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना अद्ययावत माहिती मिळवण्याची सुविधा प्रदान करेल. सायबर, आर्थिक आणि संघटित गुन्हे, तसंच अमली पदार्थ आणि मानवी तस्करीसह आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी ते विकसित करण्यात आलं असून, ते सर्व लाभधारकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणेल.

**<><><><><>**

देशाच्या संरक्षणक्षेत्राला आत्मनिर्भर बनवण्यासाठी उत्तम दर्जाच स्वदेशी तंत्रज्ञान आणि उत्पादनक्षमता विकसित करण्याची गरज असल्याचं वायुसेनाप्रमुख ए पी सिंग यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत 'अवकाशक्षेत्रातील आत्मनिर्भरता' या विषयावर आयोजित २१व्या सुब्रोतो मुखर्जी परिषदेचं उदघाटन करताना ते आज बोलत होते. विकसित भारताचं लक्ष्य २०४७ पर्यंत पूर्ण करण्यात संरक्षण आणि अवकाश तंत्रज्ञानाचा मोठा वाटा असेल आणि त्यासाठी संशोधनावर भर देण्याची गरज असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

निवडणूक आयोग आज दुपारी २ वाजता नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत घेऊन दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणार आहे. दिल्ली विधानसभेच्या ७० सदस्यांचा कार्यकाळ २३ फेब्रुवारी रोजी संपत

आहे. सत्ताधारी आम आदमी पक्षानं यापूर्वीच सर्व विधानसभा जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत तर भाजपने आतापर्यंत २९ उमेदवारांची घोषणा केली आहे. काँग्रेसनं उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली असून आतापर्यंत एकूण ४८ उमेदवारांची घोषणा केली आहे. दिल्लीत १ कोटी ५५ लाखांहून अधिक मतदारांची नोंदणी झाली आहे. त्यात ८३ लाखांहून अधिक पुरुष, ७१ लाखांहून अधिक महिला आणि १ हजार २६१ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. विकासपुरी विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ४ लाख ६२ हजारांहून अधिक मतदार आहेत तर दिल्ली छावणी विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी ७८ हजार ८९३ मतदार आहेत. गेल्या दोन महिन्यांत १८ ते १९ वयोगटातल्या ५२ हजारांहून अधिक मतदारांची भर पडली असल्याचं निवडणूक कार्यालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचा स्पॅडेक्स मोहिमेचा म्हणजे अंतराळात दोन उपग्रह एकमेकांना जोडण्याचा प्रयोग लांबणीवर टाकण्यात आला आहे. त्यामुळे आज सकाळी नियोजित असणारा हा प्रयोग आता दोन दिवसांनी म्हणजे 9 तारखेला होणार आहे. इस्रोनं समाजमाध्यमावरून ही माहिती दिली आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे डॉकिंग प्रक्रियेला ग्राउंड सिम्युलेशनद्वारे आणखी प्रमाणीकरण आवश्यक असल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

तेलंगणा उच्च न्यायालयानं माजी मंत्री आणि भारत राष्ट्र समितीचे कार्यकारी अध्यक्ष के. तारक रामाराव यांनी दाखल केलेली याचिका आज फेटाळून लावली. सत्तेत असताना २०२३ मध्ये फॉर्म्युला ई-कार शर्यतीच्या आयोजनात गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता. राव यांनी हा गुन्हा रद्द करण्याची मागणी केली होती. या प्रकरणात ईडीसमोर हजर राहण्यासाठी राव यांनी आणखी वेळ मागितला आहे.

**<><><><><>**

नेपाळ-तिबेट सीमेवर आज सकाळी झालेल्या भूकंपात ३२ जण मृत्युमुखी पडले, तर ३८ जण जखमी झाले. या भूकंपाची तीव्रता ७ पूर्णांक १ दशांश रिक्टर स्केल इतकी होती. नेपाळ सीमेजवळ तिबेट मधल्या झिझांग इथं या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीमसह उत्तर भारताच्या काही भागात या भूकंपाचे धक्के बसले.

**<><><><><>**

भारताच्या त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं मलेशिया सुपर थाउजंड(१०००) बॅडमिंटन स्पर्धेच्या मुख्य फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी थायलंडच्या ऑर्निचा जोंगसाथापोर्नपर्न आणि सुकिता सुवाचाई यांचा पराभव केला. पुरुष एकेरीत लक्ष्य सेन, प्रियांशु राजावत आणि प्रणॉय एच. एस. खेळणार आहेत तर महिला एकेरीत मालविका बनसोड, आकर्षी कश्यप आणि अनुपमा उपाध्याय खेळणार आहेत.

**//<><><><><>//**